# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र-१०१** **दिनांक - १९/०३/२०२४**

## वाहन चोरी करणाऱ्या ३ आरोपींना अटक करुन एकुण ६ मो. वाहन जप्त करुन ३ लाख ६० हजार रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश

फिर्यादी अन्वर खुज्जादीन कुरुश यांचे नाईकपाडा, वसई पुर्व परीसरात " सलामत चिकन सेंटर " नावाचे दुकान आहे. सदर दुकानाच्या बाहेर पार्क करुन ठेवलेली फियादीची होंडा कंपनीची डिओ मोटार सायकल क्रमांक एम.एच.४८-सी.जी.-४९४३ ही दि.०९/०३/२०२४ रोजी अज्ञात चोरटयाने चोरी केली. सदरबाबत वालीव पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १६१/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि. या प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वसई-विरार परीसरात मोटार वाहन चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ यांनी वाहन चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत आदेश दिले. श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक उप आयुक्त, तुळींज विभाग व श्री. जयराज रणवरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शन व सुचनांनुसार वालीव पोलीस ठाणेचे स.पो.नि. सचिन सानप व गुन्हे प्रकटीकरण पथकाने सि.सि.टी.व्ही.फुटेजच्या आधारे शोध मोहित राबवुन वसई पुर्वस्थित सातिवली वसई पुर्व परीसरातुन आरोपी नामे १)रोहीत राजेश सिंग रा.स्वामीनगर,ओव्हरब्रिजचे खाली, अंबरनाथ स्टेशनजवळ, अंबरनाथ पश्चिम २) अनिल कपुर सिंग रा. स्वामीनगर, ओव्हरब्रिजचे खाली, अंबरनाथ स्टेशनजवळ, अंबरनाथ पश्चिम व ३) मोहन हरजीत सिंग वर्ष रा.बेलचीपाडा, गौतमनगर, तुंगारेश्वर फाटयाजवळ, वसई पुर्व यांना ताब्यात घेण्यात आले. नमुद आरोपीतांकडे केलेल्या सखोल तपासात आरोपीतांकडुन वसई, विरार व नालासोपारा परीसरातुन चोरी केलेल्या ५ मोटार सायकली व १ ऑटो रिक्षा असे एकुण अं.रु. ३,६०,०००/- किंमतीची वाहने जप्त करुन एकुण ६ वाहन चोरीचे गुन्हांची यशस्वी उकल करण्यात वालीव पो.ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश आले आहे.

| अ.क्र. | गु.र.क्र. | पोलीस ठाणे |
|---|---|---|
| १ | गु.र.क्र. १६१/२०२४ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| २ | गु.र.क्र. १६२/२०२४ कलम ३७९,३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ३ | गु.र.क्र. १५७/२०२४ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ४ | गु.र.क्र. १३६/२०२४ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | वालीव पोलीस ठाणे |
| ५ | गु.र.क्र. १०७७/२०२३ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | पेल्हार पोलीस ठाणे |
| ६ | गु.र.क्र. २०४/२०२४ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | तुळींज पोलीस ठाणे |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. उमेश माने- पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/ मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/ विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.


पोलीस
वालीव पोलिस ठाणे
RR KABEL
WIRES & CABLES

------////------